ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख १८ एप्रिल, १९५१ अंक १६

फोन: ३४५१६ तार: SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन-टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.

दी
## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

[ कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली. ]

स्थापना: १९२६.

मुख्य कचेरी :
सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,११,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | १,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :
(१) गुजरी (२) शाहूपुरी-कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई-फोर्ट-(१०) मुंबई-मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—
मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.

व्ही. प. सावंत, जनरल मॅनेजर.

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

## दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

पुणें शाखा:—५७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारींचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.— ब्रँच सेक्रेटरी

—सर्व प्रांतांतील— सुती-गरम-रेशमी —खादीचें माहेरघर—

## खादी मन्दिर

२६१, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

## विविध माहिती

**पुणें जिल्हा सहकारी परिषद, १९५१**—पुणें जिल्हा सहकारी परिषद पुणें येथें ११ व १२ मे १९५१ रोजीं होणार आहे. सदर परिषदेचें उद्घाटन नामदार वैकुंठभाई मेहता, अर्थमंत्री व सहकार मंत्री, मुंबई राज्य हे करणार असून अध्यक्षस्थान आमदार यशवंतराव चव्हाण, पार्लमेंटरी सेक्रेटरी, मुंबई राज्य हे स्वीकारणार आहेत. स्वागताध्यक्ष श्री. जयवंतराव सावंत इनामदार, चेअरमन पुणें जिल्हा ए. कमिटी हे असून श्री. ना. ब. घुमटकर व श्री. प्र. ब. सूर्यवंशी हे सेक्रेटरीज आहेत.

**मुंबई–कोचीन विमान–वहातुक**—एअर सर्व्हिसेस ऑफ इंडिया ह्या कंपनीनें मुंबई ते कोचीन विमानांची सर्व्हिस सुरवात केली आहे. मुंबईहून सकाळीं ७। ला निघून दुपारीं १२–४५ ला विमान कोचीनला पोंचतें. कोचीनहून दुपारीं १–१० वाजतां निघून सायंकाळीं ६–२० ला विमान मुंबईला येतें. वाटेंत बेळगांवला १० मिनिटें तें थांबतें.

**युद्धोत्तर काळांतील चहाचा पहिला लिलांव**—युद्धोत्तर काळांतील चहाचा पहिला लिलांव लंडनला ता. १६ एप्रिल रोजीं झाला. ह्या लिलांवांत भारत, सीलोन, न्यायसाऊंड, मलाया, इंडोनेशिया, फॉर्मोसा इत्यादि देशांतील चहा होता. एकूण १,१५४ पेट्यांचा लिलांव करण्यांत आला. लिलांवांत ८ दलालांनीं भाग घेतला होता. प्रत्येक पेटींत १०० पौंड चहा होता.

**कागदासाठीं लागणाऱ्या लगद्याचा कारखाना**—काश्मीरच्या सरकारनें कागद तयार करण्यासाठी लागणारा लगदा तयार करण्याचा एक कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. जम्मू प्रांतांतील कथुआ जंगलांत लगद्यासाठी लागणारीं झाडें भरपूर आहेत. हीं झाडें जम्मू–पठाणकोट रस्त्याच्या दुतर्फाहि आहेत. त्याशिवाय कागदासाठी लागणारें गवतहि ह्या रस्त्याच्या १०–१५ मैलांच्या परिसरांत आहे.

**बोट–कंपन्यांना कर्जें**—भारतांत एकूण २२ कंपन्या सागरी वहातूक करण्यांत गुंतलेल्या आहेत. त्यांपैकीं बऱ्याच कंपन्यांनीं भारतीय सरकारकडे कर्जाची मागणी केली आहे. ह्या अर्जांचा विचार सध्यां सरकारकडून चालू आहे. विजगापट्टम् येथील गोदींत तयार होणारीं जहाजें सर्व हिंदी कंपन्यांना योग्य रीतीनें वाटून देण्यांत येतील असें समजतें. कोणत्याहि एकाच कंपनीला तीं सर्व देण्यांत येणार नाहींत.

**सिंगापूर येथें भारतीय बँक**—सिंगापूरमध्यें आणखी दोन भारतीय बँका आपल्या शाखा उघडणार आहेत. युनायटेड कमर्शिअल बँकेच्या शाखेचें उद्घाटन ता. १६ एप्रिल रोजीं करण्यांत आलें. बँक ऑफ इंडिआच्या शाखेचें उद्घाटन ता. १ मे रोजीं आग्नेय आशिआंतील ब्रिटिश कमिशनर मि. मॅकडोनल्ड करणार आहेत असें समजतें. ह्या शाखांच्या उद्घाटनानंतर सिंगापूरमधील हिंदी बँकांची संख्या चार होईल.

**ट्रॅक्टर्सची शिरगणती**—राज्य सरकारांनीं आपल्या हद्दींतील यंत्रचालित नांगरांची आणि गुरांची शिरगणती करावी अशी सूचना मध्यवर्ती सरकारच्या अन्न व शेतकी खात्यातर्फें करण्यांत आली आहे. ही शिरगणती मे महिन्यांत करण्यांत येणार आहे असें कळतें. देशांतील ट्रॅक्टर्सचा जास्तींत जास्त उपयोग करण्यांत यावा म्हणून ही मोजदाद करण्यांत येणार आहे.

## पोस्टाच्या दरांत वाढ

### १ मे पासून अंमलबजावणी

**लोकल–पत्रें ( पाकिटें )** हल्लीं १ आण्यांत जातात. ही सवलत रद्द होऊन सर्व पत्रांना २ आ. चीं तिकिटें लावलीं पाहिजेत. १॥ आणावालें लेटर कार्ड अर्थातच वापरण्यास हरकत नाहीं. लोकल पोस्ट कार्डाचा सध्याचा दर २ पैसे आहे, त्यांत वाढ होणार नाहीं.

**रजिस्ट्रेशन फी** सध्या ४ आणे आहे, ती ४॥ आणे होणार आहे.

व्ही. पी.:—जेवढ्या रकमेची व्ही. पी. असेल, तेवढ्या रकमेचा विमा सक्तीनें उतरलाच पाहिजे. २५ रु. पर्यंतच्या व्ही. पी. चा विमा उतरला नाहीं तरी चालेल. २५ रु. पर्यंतच्या व्ही. पी. स १ आणा आणि २५ रु. वरील व्ही. पी.स २ आणे असा आणखी जादा चार्ज द्यावा लागेल. उदाहरणार्थ, २५ रु. पर्यंतच्या व्ही. पी. स प्रत्यक्ष पडणारें (पत्र, पॅकेट, असेल त्याप्रमाणें) पोस्टेज, रजिस्ट्रेशन फी ४॥ आणे आणि व्ही पी. चार्ज १ आणा, एवढ्याचीं तिकिटें लावावीं लागतील २५ रु. वरील व्ही. पी. स प्रत्यक्ष पोस्टेज, रजिस्ट्रेशन फी ४॥ आणे आणि किंमतीप्रमाणें विम्याचा आकार पडेल. हा आकारहि वाढला आहे.

**विमा चार्ज**—पहिल्या १०० रुपयांपर्यंत ४ आणे आणि पुढील प्रत्येक १०० रुपयांस २ आणे पडेल.

**मनिऑर्डर कमिशन**—सध्यां प्रत्येक १० रुपयांस २ आणे आहे. नवीन दर ( अ ) ५ रुपयांपर्यंत २ आणे. ( ब ) ५ रुपयांचेवर आणि १० रुपयांपर्यंत ३ आणे. ( क ) १० रुपयांवर आणि १५ रुपयांपर्यंत ४ आणे १५ रुपयांवर आणि २५ रुपयांपर्यंत ६ आणे. २५ रुपयांवरील प्रत्येक पुऱ्या २५ रुपयांस ६ आणे, आणि बाकीच्या रकमेवर ( अ ). ( ब ) आणि ( क ) प्रमाणें.


दि
बँक ऑफ महाराष्ट्र
लि०

स्थापना १९३५ : शेड्यूल्ड बँक

संचालक मंडळ

श्री. धों. कृ. साठे (अध्यक्ष) श्री. श्री. गो. मराठे (उपाध्यक्ष)
श्री. न. ग. पवार श्री. मा. रा. जोशी
श्री. फ. दो. पदमजी श्री. मा. वी. शहा
श्री. शं. ल. किर्लोस्कर श्री. भा. म. गुप्ते

एकूण खेळतें भांडवल
रु. ३ कोटींचे वर

मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें २.

चिं. वि. जोग,
मॅनेजर.

( पॅरामाऊंट लि. )

# अर्थ

बुधवार, ता. १८ एप्रिल, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद् वामन काळे


## १९५१ ची ब्रिटनची आर्थिक पहाणी

१९४७ पासून गेलीं चार वर्षे ब्रिटन आर्थिक व औद्योगिक जीवनाच्या दृष्टीनें एका वर्षापुरेसा आर्थिक अंदाज आंखीत असते. त्याप्रमाणें ८ एप्रिल रोजीं १९५१ सालासाठी अंदाज प्रसिद्ध झाला आहे. या प्रकाराची ही पांचवी पाहाणी आहे. गेल्या वर्षापासून दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळांत ब्रिटननें औद्योगिक उत्पादन व निर्गत व्यापार या बाबतींत आपली निश्चित प्रगति केली व १९४६ मध्यें मोडकळीस आलेली अर्थ-व्यवस्था पुन्हा गेल्या वर्षी सुधारावयास लागली होती, परंतु यंदा ब्रिटनपुढें युद्धविषयक लष्करी तयारी करण्याच्या कार्यक्रमामुळें नवीन प्रश्न निर्माण झाले आहेत. पुढील तीन वर्षांत १९५४ अखेरपर्यंत ४७० कोटी पौंड युद्धतयारीप्रीत्यर्थ खर्ची पडणार असून ब्रिटनच्या उद्योगधंद्यांना आवश्यक असा कच्चा माल म्हणजे सल्फर, कापूस, जस्त, तांबे इ. मालाच्या किंमती वाढत असून त्यांचा तीव्रतेनें तुटवडा भासत आहे, व यामुळें निर्गतीचें प्रमाण कायम ठेवून व शक्य तर तीं वाढवून ब्रिटनला व्यापारांत समतोलपणा राखावा लागेल व यासाठीं जनतेच्या आवश्यक गरजांना कात्री लावावी लागेल. किंमतींना आळा घालणें व वाटप पद्धति या गोष्टी ब्रिटनला चालू ठेवाव्या लागणार. लष्करी कार्यक्रमासाठी तयारी करावयाचा म्हणजे पर-राष्ट्रीय व्यापार समाधानकारक परिस्थितींत राखला पाहिजे व देशांतील उद्योगधंद्यांत गुंतविल्या जाणाऱ्या भांडवलाचें प्रमाण समाधानकारक राहिलें पाहिजे. परंतु संरक्षणा-साठी तयारी करावयाची म्हणजे त्याचा परिणाम निर्गतीसाठी आवश्यक असणाऱ्या औद्योगिक उत्पादनावर होणारच. १९५४ सालापर्यंत संरक्षणाच्या कारखान्यासाठी पांच लक्ष जादा काम-गारांची भरती करावी लागेल. पुढील दोन वर्षांत विमानें व दारूगोळा यांच्या कारखान्यासाठी १॥ लक्ष जादा कामगार लागतील. सध्यां सल्फरच्या टंचाईचा परिणाम खतें, रेयॉन, रबर, रासायनिक इ. धंद्यांना तीव्रतेनें जाणवत आहे.

गेलीं तीन वर्षे दरवर्षी ७ टक्के या प्रमाणांत उत्पादनक्षमता वाढत आहे व पुढील वर्षी कच्च्या मालाचा योग्य रीतीनें पुरवठा होईल तर ही उत्पादनक्षमतेंतील वाढ टिकून राहील. १९५१ सालीं १९५० च्या मानानें उत्पादनक्षमता चार टक्क्यांनीं वाढेल असें गृहीत धरण्यांत आलें आहे. १९५० मध्यें कोळशाचें उत्पा-दन विशेष रीतीनें वाढलें व १९५१ सालीं २१९ ते २२२ दश-लक्ष टन कोळशाचें उत्पादन होईल असा अंदाज आहे १९५० मध्यें विजेच्या उत्पादनांतहि विशेष वाढ झाली व पुढील वर्षी ही वाढ चालू राहील. १९५१ सालीं पोलादाचें उत्पादनांतहि वाढ होईल व तें सुमारें १६॥ दशलक्ष टन होईल. परंतु युद्धसाहित्या-साठीं पोलादाचा अंतर्गत खप वाढेल व त्यामुळें पोलादाच्या निर्गतीचें प्रमाण १९५० इतकें राहणार नाहीं. धातूंचा उपयोग करणाऱ्या विविध मालाचें उत्पादन गेल्या वर्षी १० टक्क्यांनीं वाढलें, परंतु पोलाद व नॉन-फेरस धातु यांच्या तुटवड्यामुळें हें उत्पादन पुढील वर्षी कमी होईल. पुढील वर्षी मशीनटूल्सचीहि टंचाई भासेल. मोटारींच्या कारखान्यांचा उपयोग विमानांचे व इतर गाड्यांचे सुटे भाग करण्यासाठी करावा लागल्यामुळें मोटा-रींचें उत्पादन बरेंच घटेल व त्यामुळें १९५१ मध्यें अंतर्गत खपासाठीं ८० हजार व निर्गतीसाठी ८० हजार मोटारी तयार केल्या जातील. १९५० मध्यें मोटारींचा ब्रिटनमधील खप १ लक्ष, १० हजार होता व परदेशांत विक्रीसाठी १ लक्ष, ५ हजार मोटारी पाठविण्यांत आल्या. इमारतींचें बांधकाम शक्य तितकें गेल्या वर्षाप्रमाणें चालू ठेवण्यांत येईल. कापड व रेयॉन यांचे उत्पादन घटण्याचा संभव आहे.

१९५० मध्यें ब्रिटनला परराष्ट्रीय व्यापारांत २२९ दशलक्ष पौंड अनुकल तफावत उरली. गेल्या ३० वर्षांत एवढी अनुकूल तफावत कधींहि उरली नव्हती. यावरून गेल्या पांच वर्षांत ब्रिटननें केलेल्या प्रगतीची कल्पना येते. आयातीसाठी १९५० या वर्षी २३५० दशलक्ष पौंड खर्ची पडले, परंतु मालाच्या किंमती वाढल्यामुळें १९५१ सालीं आयातीवर ३२०० दशलक्ष पौंड खर्च करावे लागतील. परदेशांत गंतविलेल्या भांडवलावरील व्याज, ब्रिटिश तेल-कंपन्यांची प्राप्ति, वाहातूक कंपन्या व प्रवासी लोक यांपासून मिळणारा पैसा या सर्वांच्या रूपाने १९५१ या वर्षी ४५० दशलक्ष पौंड मिळूं शकतील व बाकीचे २७५० दशलक्ष पौंड मालाच्या निर्गतीनें मिळवावे लागतील. गेल्या वर्षी निर्गती-मुळें २२०० दशलक्ष पौंड मिळाले होते. म्हणजे: १९५१ सालीं निर्गतींत ५५० दशलक्ष पौंड किंमतीची वाढ करावी लागेल. जर्मनी व जपान यां देशांचें उत्पादन वाढल्यास ब्रिटनला कांहीं विक्री मालाच्या बाबतींत अडचणी निर्माण होतील. एकंदर परि-स्थिति लक्षांत घेऊन कापड इ. बाबतींत अंतर्गत मागणी कमी करावी लागेल. गेल्या वर्षी स्टार्लिंग गटांतील देशांना सोनें व डॉलर यांच्या व्यवहारांत ८०५ दशलक्ष डॉलर्स अनुकूल तफावत उरली, परंतु १९४९ सालीं याच बाबतींत १५३१ दशलक्ष डॉलर्सची तूट आली होती.

मुलकी व लष्करी व्यवहारासाठी १९५१ या वर्षी सरकारला १९५० चे बाजारभाव कायम असल्यास ७५ दशलक्ष पौंड जास्त खर्च करावा लागेल. खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठीं १९५१ मध्यें औद्योगिक उत्पादन चार टक्क्यांनीं वाढलें तरी अंतर्गत मालाच्या खपामध्ये थोडीशी कपात करावी लागेल. गेल्या वर्षी मांस, साखर, फळें या बाबतींत बेतानेंच खप व खर्च होत होता. हेंच प्रमाण १९५१ मध्यें चालू ठेवतां येईल परंतु कापड व गृहोपयोगी धातूचा माल या बाबतींत कपात करावी लागेल. १९५० सालीं खाजगी बचत ३३० दशलक्ष पौंड झाली, परंतु आर्थिक परिस्थिति आटोक्यांत राखण्यासाठी १९५१ मध्यें खाजगी बचत निदान ४४५ दशलक्ष पौंड झाली पाहिजे.

### सारांश व हिंदने शिकण्यासारख्या गोष्टी

१९५१ सालचा ब्रिटनच्या अर्थव्यवहाराचा हा अंदाज परि-

स्थिति बिकट होत असल्याचें स्पष्टपणें दाखवीत आहे. युद्धासाठीं लष्करी तयारी व त्याजबरोबर आर्थिक स्वातंत्र्य या गोष्टी ब्रिटनला साधावयाच्या असल्यामुळें त्याग, कष्ट व बदललेल्या परिस्थितीशीं एकरूप होणें या गोष्टींची सर्वसाधारण ब्रिटिश नागरिकाकडून अपेक्षा आहे. पांच वर्षांपूर्वी अत्यंत कठीण अशा आर्थिक आपत्तीला नेटानें तोंड द्यावयाला ब्रिटनने सुरवात केली व वाटपपद्धति, गरजा कमी करणें, जास्त काम करणें, निर्गत वाढविणें या गोष्टींचा अवलंब करून चार वर्षांतच ब्रिटननें परिस्थिति पूर्णपणें आटोक्यांत आणली, तीं इतकी कीं मार्शल योजनेनुसार मिळणारी मदत ब्रिटननें आपण होऊन स्वीकारण्याचें बंद केलें, अनुकूल तफावत दाखविणारा परराष्ट्रीय व्यापार केला, व आर्थिक स्वातंत्र्य पुन्हा संपादन केलें. 'ब्रिटनच्या पाठीशीं अशा तऱ्हेची पार्श्वभूमि असल्यामुळें आजच्याहि परिस्थितीला ब्रिटन तोंड देऊं शकेल यांत शंका नाहीं.

ब्रिटनच्या या उदाहरणावरून हिंदनें शिकण्यासारख्या पुष्कळ गोष्टी आहेत. त्या थोडक्यांत अशा कीं प्रत्येकाने आपली कार्यक्षमता वाढविली पाहिजे, उत्पादनवाढीला मदत केली पाहिजे, वाटपपद्धति व नियंत्रणें यांचा पूर्ण उपयोग करून परिस्थिति सुधारण्यासाठीं निश्चयानें प्रयत्न केले पाहिजेत. डोळे दिपवून टाकणारीं भाषणें करण्यांत किंवा नुसते कार्यक्रम जाहीर करण्यांत कांहींच अर्थ नाहीं.

---

आसाममध्यें साखरेचा कारखाना—आसाममध्यें साखरेचा कारखाना काढण्यासाठीं ५ कंपन्यांकडून अर्ज आले आहेत. हे कारखाने नवे नसून आसाम बाहेरील प्रांतांतून आसामांत येणारे जुनेच कारखाने आहेत अशी माहिती आसाम विधिमंडळांत सांगण्यांत आली. जुन्या कारखान्यांची यंत्रसामुग्री खोलून ती पुन्हा नव्या जागीं बसविण्याचा खर्च कारखानदार स्वतःच करणार आहेत. ह्या अर्जांचा आसाम सरकार विचार करीत आहे.

सडपातळ होण्याचें वेड—ब्रिटनच्या राजाचे वैद्यकीय सल्लागार लॉर्ड हॉर्डर ह्यांनीं स्त्रियांना असा उपदेश केला आहे कीं, सडपातळ होण्याच्या वेडाला त्यांनीं बळी पडूं नये. सडपातळ आकृति असण्यापेक्षां शारीरिक दृष्ट्या कार्यक्षम असणें अधिक महत्त्वाचें आहे. सडपातळ होण्यासाठीं आहाराचें कडक पथ्य पाळणें कधीं कधीं धोक्याचें असतें, असेंहि ते म्हणाले, ब्रिटनमधील ५०,००० स्त्रियांनीं सडपातळ होण्यासाठीं ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनकडे आहार-पत्रकें मागितलीं होतीं. परंतु तीं त्यांना पुरविण्यांत येणार नाहींत.

कॅन्सर सोसायटी—कॅन्सरच्या रोगावर नियंत्रण ठेवण्यासाठीं इंडियन कॅन्सर सोसायटी म्हणून एक संस्था स्थापन करण्यांत आली आहे. इंटरनॅशनल सेंटर ला कॅन्सर ह्या संस्थेच्या विनंतीवरून ८ एप्रिल हा दिवस वर्ल्ड कॅन्सर डे म्हणून पाळण्यांत आला. भारतांत कॅन्सरच्या रोगानें सुमारें २ लाख लोक दगावतात; निदान १० लाख लोकांना तरी कॅन्सर झालेला असतो असा अंदाज करण्यांत आला आहे.

ब्रिटनचें उत्पन्न आणि खर्च—३१ मार्च, १९५१ अखेर संपणाऱ्या फडणिशी वर्षांत ब्रिटनचें उत्पन्न ३९७८ दशलक्ष पौंड आणि खर्च ३२५८ दशलक्ष पौंड दाखविण्यांत आला आहे. शिल्लक ७२० दशलक्ष पौंडांची आहे. अंदाजपत्रकापेक्षां उत्पन्न ८ कोटी पौंडांनीं अधिक वाढलें आणि खर्च १९.७ कोटी पौंडांनीं कमी झाला.

## बँकांनीं ह्याचा विचार करावा

संपादक 'अर्थ' साप्ताहिक यांसीः—

कांहीं दिवसांपूर्वी एका गृहस्थांनीं मला आपली अडचण सांगितली ती अशीः—ते गृहस्थ म्हणाले, कांहीं वर्षांपूर्वी मी एका बँकेचे शेअर्स विकत घेतले होते. पुढे मला पैशाची गरज लागली तेव्हां त्याच शेअर्सच्या तारणावर दुसऱ्या एका बँकेनें मला कर्ज दिलें. माझी अशी कल्पना होती कीं हें घेतलेलें कर्ज मी वेळेवर बँकेला परत करूं शकेन परंतु माझ्या दुर्दैवानें माझा सर्वच बाजूंनीं कोंडमारा झाला. कर्ज ठरल्याप्रमाणें मी परत करूं शकलोंच नाहीं. पण उशीरानें सुद्धां कर्ज देणें अशक्य वाटूं लागलें. बँकेचा तगादा सुरू झाला. तेव्हां माझे शेअर्स ज्या बँकेचे आहेत त्याच बँकेला विकून टाका व मला तोषीस न लागेल अशा बेतानें कर्जमुक्त करा अशी मी धनको बँकेला विनंति केली. आश्चर्याची गोष्ट अशी कीं, ज्या बँकेचे शेअर्स होते त्या बँकेनें शेअर्स मूळ किंमतीला विकत घेण्याचें नाकारलें, इतकेंच नव्हे तर हा परत खरेदीचा व्यवहार आपल्याकडे होणार नाहीं असें स्पष्ट सांगितलें. बँकेने असें उत्तर देऊन मला अडचणींत घालावें काहो? माझ्या मदतीला या बँकेनें कां येऊं नये? जितके पैसे भरले तेवढेच पैसे मला परत द्या व मला मदत करा अशी माझी विनंति बँकेनें कां मानूं नये?"

सद्गृहस्थ अत्यंत काकुळतेनें बोलत होता. त्याच्या प्रश्नास मला उत्तर देतां आलें नाहीं. ज्या बँकेचे शेअर्स होते त्या बँकेनें तरी शेअर्सपोटीं जी रक्कम वसूल झाली असेल तेवढी द्यावयास पाहिजे होती असें मला वाटलें; आणि तसें अनेकांनाहि वाटेल. पण हा आर्थिक प्रश्न असून केवळ 'मला असें वाटतें' एवढ्यावर सुटणार नाहीं. असे पैसे परत द्यावयाचे तर अनेक लोक अडचण सांगून आपले शेअर्स बँकांना परत करतील. ही एक त्यांत अडचण असावीशी वाटते. पण कांहीं असलें तरी या बाबतींत एकादा मार्ग काढतां येण्यासारखा आहे का पहा.

निरनिराळ्या महाराष्ट्र कंपन्यांचे शेअर्सना बाजारांत किंमत आणण्याचे दृष्टीने कांहीं लोकांनी प्रयत्न चालविले होते. त्यांत आपली किती प्रगति झाली आहे? इतर लिमिटेड कंपन्यांचा प्रश्न जरी तात्पुरता दूर ठेवला तरी निदान बँकांच्या शेअर्सना तरी बाजारांत किंमत कां नसावी? ज्या बँकेच्या शेअर्सवर कर्ज काढण्यांत आलें त्या बँकेनें तरी आपल्या शेअर्सच्या वसूलीइतकी रक्कम कां देऊं नये? आपण अशी कांहीं व्यवस्था करूं शकणार नाहीं का?

बँकांनीं व तज्ज्ञांनीं याचा विचार करावा अशी विनंति आहे.

आपला विश्वासू,
गोपाळ गोविंद अधिकारी

पुणें, दि. ६ एप्रिल १९५१

---

## शेड्युल्ड बँकांची परिस्थिति

शेड्युल्ड बँकांनीं दिलेलीं कर्जें ३० मार्च, १९५१ अखेरच्या आठवड्यांत ५२५.८ कोटी रुपयांवरून ५३३.६ कोटी रुपयांवर गेलीं. रिझर्व्ह बँकेजवळील त्यांच्या ठेवीहि ५२.४४ कोटींवरून ५८.३५ कोटींवर गेल्या. बँकांजवळील ठेवींतहि वाढ होऊन त्या ६१२.५१ कोटींच्या ६१६.२५ कोटी झाल्या.

### सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक लि., सातारा

वरील बँकेस १९५० वर्षअखेरचे व्यवहारांत ३३,२९४ रु. नफा झाला. रिझर्व्ह फंड, संशयित कूळ फंड, इनव्हेस्टमेंट रिझर्व्ह फंड, इमारत फंड ह्यांत मिळून १६,२३७ रु. ८ आ. टाकून व ३,००० रु. नोकरवर्गास बोनस देऊन ऑर्डिनरी भागांस ६% करमाफ डिव्हिडंड देण्यासाठीं १४,५०० रु. चा विनियोग करण्यांत आला. बँकेच्या इनव्हेस्टमेंटची बाजारभावाने होणारी किंमत ताळेबंदांत दाखविलेल्या किंमतीपेक्षां जास्त आहे ही गोष्ट ताळेबंदावरून शोधून काढतां येत असली तरी तो गुप्त रिझर्व्ह स्पष्ट करण्याचें बोर्डानें टाळलें आहे, ही गोष्ट बँकेच्या सावधगिरीच्या धोरणाची निदर्शक आहे. इतर बहुतेक बँकांना इनव्हेस्टमेंटमध्यें घसारा सोसावा लागलेला आहे.

संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | २,३५,६९० | रोख व बँकांत | ३,८०,२६९ |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,०३,६६२ | इनव्हेस्टमेंट | २०,२१,८४२ |
| ठेवी | ४२,४५,४८७ | कर्जें | २४,५२,५६० |

( चेअरमनः शं. ह. साठे, बी. ए., एलएल बी. मॅनेजरः व. य. कुळकर्णी, एम. ए., बी. कॉम. )

---

### दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

अहवालाचे वर्षी कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूज ह्यांच्या परवानगीनें दर्शनी किंमत रु. ३,००,००० चे ६,००० शेअर्स विक्रीस काढले होते, ते सर्व खपले आहेत. १९५० सालांतील व्यवहारांत बँकेस ४९,०२६ रु. नफा झाला. १०,००० रु. रिझर्व्ह फंड, ४,००० रु. इनव्हेस्टमेंट रिझर्व्ह फंड, ४,२०० रु. नोकरवर्गास बोनस आणि ३०,००० रु. डिव्हिडंड ( ६% करमाफ ) अशी नफावाटणी करण्यांत आली आहे. ८६½ लक्ष रुपयांच्या खेळत्या भांडवलांत युनायटेड वेस्टर्नचें स्वतःचें ७,११,४६५ रु. चें भांडवल आहे.

संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ५,६०,४६५ | रोख व बँकांत | १४,९०,८१० |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,५१,००० | इनव्हेस्टमेंट | ४०,३१,२९६ |
| ठेवी | ७५,३९,४३० | कर्जें | २५,३०,९११ |

( चेअरमनः वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., मॅनेजरः सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम. सेक्रेटरीः रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. )

---

**ब्रिटनमध्यें केळीं महागलीं**—केळ्यांचें वाटप करण्याच्या खर्चांत वाढ झाल्यामुळें केळ्यांच्या किरकोळ विक्रीच्या किंमतींत वाढ करण्यांत आली आहे. १८ वर्षांखालील मुलें, गर्भवती स्त्रिया आणि सत्तरीच्या आसपासचे वृद्ध ह्यांच्यासाठीं केळीं राखून ठेवण्याची पद्धतहि बंद करण्यांत आली आहे. इंग्लंड, वेल्स व उत्तर आयर्लंड ह्या भागांत १ पौंड केळ्याला १ शिलिंग किंमत ठेवण्यांत आली आहे.

**ब्रिटिश जहाजापासून भारताला उत्पन्न**—गेल्या तीन वर्षांत भारताच्या किनाऱ्याला लागणाऱ्या ब्रिटिश जहाजांपासून भारतीय सरकारला दरवर्षी सरासरी ९३,१९,००० रुपये कराचें उत्पन्न झालें. १९४९–५० सालीं इतर परदेशी जहाजांपासून भारत सरकारनें १,०९,००० रुपये कर वसूल केला.


## दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली.

स्थापना १९२७

हेड ऑफिसः—हायस्कूल रोड, सांगली.

शाखाः—१ जत, २ मिरज.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये | १०,००,००० |
| खपलेलें „ | रुपये | २,२१,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रुपये | १,४२,००० |
| फंडस् | रुपये | १,२३,००० |
| खेळतें भांडवल | रुपये | १५,००,००० चे वर, |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

सरकारतर्फेः—

मे. भ. अं. दप्तरदार, B. A., चेअरमन.
मे. असि. रजिस्ट्रार को. सो. सातारा.
मे. रा. बा. आरवाडे, B. A., LL. B.
मे. ज. वि. करमरकर, सराफ.

सोसायट्यांतर्फेः—

मे. के. आ. चौगुले, B. A., LL. B.
मे. हिं. म. पाटील.
मे. रा. म. पाटील.

वैयक्तिक सभासदांतर्फेः—

मे. म. ह. गोडबोले, B. A., LL. B.
मे. सु. आ. पाटील.

करंट, सेव्हिंग्ज व कायम ठेवी स्वीकारल्या जातात.
बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

ना. पां. ठाणेदार, मॅनेजर.
भ. अं. दप्तरदार, बी. ए. चेअरमन.

## बँक ऑफ पूना, लिमिटेड.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

**— संचालक मंडळ —**

१ श्री. मुरलीधर चतुरभुज लोया, ( चेअरमन )
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी., व्हा. चेअरमन
३ डॉ. ना. भि. परुळेकर, संचालक 'सकाळ'
४ श्री. फ्रामजी पेस्तनजी पोचा, सीड्स मर्चंट
५ श्री. लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी, बँकर्स व मर्चंट सोलापूर
६ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी, व्यापारी
७ श्री. गणपतराव काळूराम नाईक, बी. एस्सी., बी. ई., एलएल. बी.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत मौल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याची सोय.

ठेवींवर व्याज—
चालू खातें अर्धा टक्का, सेव्हिंग्ज १॥ टक्के,
मुदत ठेव १ वर्ष २॥ टक्के, ३ वर्षे ३ टक्के.

शाखा स्थानिक—(१) भवानी पेठ, व (२) सदाशिव पेठ, पुणें.
बाहेरगांवीं—सोलापूर, सांगली.
मुख्य ऑफिसः—४५५ रविवार पेठ, पुणें नं. २

गो. गं. साठे.
मॅनेजर.

स्थिति बिकट होत असल्याचें स्पष्टपणें दाखवीत आहे. युद्धासाठीं लष्करी तयारी व त्याजबरोबर आर्थिक स्वातंत्र्य या गोष्टी ब्रिटनला साधावयाच्या असल्यामुळें त्याग, कष्ट व बदललेल्या परिस्थितीशीं एकरूप होणें या गोष्टींची सर्वसाधारण ब्रिटिश नागरिकाकडून अपेक्षा आहे. पांच वर्षांपूर्वीं अत्यंत कठीण अशा आर्थिक आपत्तीला नेटानें तोंड द्यावयाला ब्रिटनने सुरवात केली व वाटपपद्धति, गरजा कमी करणें, जास्त काम करणें, निर्गत वाढविणें या गोष्टींचा अवलंब करून चार वर्षांतच ब्रिटननें परिस्थिति पूर्णपणें आटोक्यांत आणली, तीं इतकी कीं मार्शल योजनेनुसार मिळणारी मदत ब्रिटननें आपण होऊन स्वीकारण्याचें बंद केलें, अनुकूल तफावत दाखविणारा परराष्ट्रीय व्यापार केला, व आर्थिक स्वातंत्र्य पुन्हा संपादन केलें. 'ब्रिटनच्या पाठीशीं अशा तऱ्हेची पार्श्वभूमि असल्यामुळें आजच्याहि परिस्थितीला ब्रिटन तोंड देऊं शकेल यांत शंका नाहीं.

ब्रिटनच्या या उदाहरणावरून हिंदनें शिकण्यासारख्या पुष्कळ गोष्टी आहेत. त्या थोडक्यांत अशा कीं प्रत्येकाने आपली कार्यक्षमता वाढविली पाहिजे, उत्पादनवाढीला मदत केली पाहिजे, वाटपपद्धति व नियंत्रणें यांचा पूर्ण उपयोग करून परिस्थिति सुधारण्यासाठीं निश्चयानें प्रयत्न केले पाहिजेत. डोळे दिपवून टाकणारीं भाषणें करण्यांत किंवा नुसते कार्यक्रम जाहीर करण्यांत कांहींच अर्थ नाहीं.

---

**आसाममध्यें साखरेचा कारखाना**—आसाममध्यें साखरेचा कारखाना काढण्यासाठीं ५ कंपन्यांकडून अर्ज आले आहेत. हे कारखाने नवे नसून आसाम बाहेरील प्रांतांतून आसामांत येणारे जुनेच कारखाने आहेत अशी माहिती आसाम विधिमंडळांत सांगण्यांत आली. जुन्या कारखान्यांची यंत्रसामुग्री खोलून ती पुन्हा नव्या जागीं बसविण्याचा खर्च कारखानदार स्वतःच करणार आहेत. ह्या अर्जांचा आसाम सरकार विचार करीत आहे.

**सडपातळ होण्याचें वेड**—ब्रिटनच्या राजाचे वैद्यकीय सल्लागार लॉर्ड हॉर्डर ह्यांनीं स्त्रियांना असा उपदेश केला आहे कीं, सडपातळ होण्याच्या वेडाला त्यांनीं बळी पडूं नये. सडपातळ आकृति असण्यापेक्षां शारीरिक दृष्ट्या कार्यक्षम असणें अधिक महत्त्वाचें आहे. सडपातळ होण्यासाठी आहाराचें कडक पथ्य पाळणें कधीं कधीं धोक्याचें असतें, असेंहि ते म्हणाले, ब्रिटनमधील ५०,००० स्त्रियांनीं सडपातळ होण्यासाठी ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनकडे आहार-पत्रकें मागितलीं होतीं. परंतु तीं त्यांना पुरविण्यांत येणार नाहींत.

**कॅन्सर सोसायटी**—कॅन्सरच्या रोगावर नियंत्रण ठेवण्यासाठीं इंडिअन कॅन्सर सोसायटी म्हणून एक संस्था स्थापन करण्यांत आली आहे. इंटरनॅशनल सेंटर ला कॅन्सर ह्या संस्थेच्या विनंतीवरून ८ एप्रिल हा दिवस वर्ल्ड कॅन्सर डे म्हणून पाळण्यांत आला. भारतांत कॅन्सरच्या रोगानें सुमारें २ लाख लोक दगावतात; निदान १० लाख लोकांना तरी कॅन्सर झालेला असतो असा अंदाज करण्यांत आला आहे.

**ब्रिटनचें उत्पन्न आणि खर्च**—३१ मार्च, १९५१ अखेर संपणाऱ्या फडणिशी वर्षांत ब्रिटनचें उत्पन्न ३९७८ दशलक्ष पौंड आणि खर्च ३२५८ दशलक्ष पौंड दाखविण्यांत आला आहे. शिल्लक ७२० दशलक्ष पौंडांची आहे. अंदाजपत्रकापेक्षां उत्पन्न ८ कोटी पौंडांनीं अधिक वाढलें आणि खर्च १९·७ कोटी पौंडांनीं कमी झाला.

## बँकांनीं ह्याचा विचार करावा

संपादक ' अर्थ ' साप्ताहिक यांसीः—

कांहीं दिवसांपूर्वीं एका गृहस्थांनीं मला आपली अडचण सांगितली ती अशीः—ते गृहस्थ म्हणाले, कांहीं वर्षांपूर्वीं मी एका बँकेचे शेअर्स विकत घेतले होते. पुढे मला पैशाची गरज लागली तेव्हां त्याच शेअर्सच्या तारणावर दुसऱ्या एका बँकेनें मला कर्ज दिलें. माझी अशी कल्पना होती कीं हें घेतलेलें कर्ज मी वेळेवर बँकेला परत करूं शकेन परंतु माझ्या दुर्दैवानें माझा सर्वच बाजूंनीं कोंडमारा झाला. कर्ज ठरल्याप्रमाणें मी परत करूं शकलोंच नाहीं. पण उशीरानें सुद्धां कर्ज देणें अशक्य वाटूं लागलें. बँकेचा तगादा सुरू झाला. तेव्हां माझे शेअर्स ज्या बँकेचे आहेत त्याच बँकेला विकून टाका व मला तोषीस न लागेल अशा बेताने कर्जमुक्त करा अशी मी धनको बँकेला विनंति केली. आश्चर्याची गोष्ट अशी कीं, ज्या बँकेचे शेअर्स होते त्या बँकेने शेअर्स मूळ किंमतीला विकत घेण्याचें नाकारलें, इतकेंच नव्हे तर हा परत खरेदीचा व्यवहार आपल्याकडे होणार नाहीं असें स्पष्ट सांगितलें. बँकेने असें उत्तर देऊन मला अडचणींत घालावें काहो ? माझ्या मदतीला या बँकेनें कां येऊं नये ? जितके पैसे भरले तेवढेच पैसे मला परत द्या व मला मदत करा अशी माझी विनंति बँकेनें कां मानूं नये ? ”

सद्गृहस्थ अत्यंत काकूळतेनें बोलत होता. त्याच्या प्रश्नास मला उत्तर देतां आलें नाहीं. ज्या बँकेचे शेअर्स होते त्या बँकेनें तरी शेअर्सपोटीं जी रक्कम वसूल झाली असेल तेवढी द्यावयास पाहिजे होती असें मला वाटतें; आणि तसें अनेकांनाहि वाटेल. पण हा आर्थिक प्रश्न असून केवळ ' मला असें वाटतें ' एवढ्यावर सुटणार नाहीं. असे पैसे परत द्यावयाचे तर अनेक लोक अडचण सांगून आपले शेअर्स बँकांना परत करतील. ही एक त्यांत अडचण असावीशी वाटते. पण कांहीं असलें तरी या बाबतींत एकादा मार्ग काढतां येण्यासारखा आहे का पहा.

निरनिराळ्या महाराष्ट्र कंपन्यांचे शेअर्सना बाजारांत किंमत आणण्याचे दृष्टीने कांहीं लोकांनी प्रयत्न चालविले होते. त्यांत आपली किती प्रगति झाली आहे ? इतर लिमिटेड कंपन्यांचा प्रश्न जरी तात्पुरता दूर ठेवला तरी निदान बँकांच्या शेअर्सना तरी बाजारांत किंमत कां नसावी ? ज्या बँकेच्या शेअर्सवर कर्ज काढण्यांत आलें त्या बँकेनें तरी आपल्या शेअर्सच्या वसूलीइतकी रक्कम कां देऊं नये ? आपण अशी कांहीं व्यवस्था करूं शकणार नाहीं का ?

बँकांनीं व तज्ज्ञांनीं याचा विचार करावा अशी विनंति आहे.

आपला विश्वासू,

गोपाळ गोविंद अधिकारी

पुणें, दि. ६ एप्रिल १९५१

---

## शेड्यूल्ड बँकांची परिस्थिति

शेड्यूल्ड बँकांनीं दिलेलीं कर्जें ३० मार्च, १९५१ अखेरच्या आठवड्यांत ५२५·८ कोटी रुपयांवरून ५३३·६ कोटी रुपयांवर गेलीं. रिझर्व्ह बँकेजवळील त्यांच्या ठेवीहि ५२·४४ कोटीवरून ५८·३५ कोटीवर गेल्या. बँकांजवळील ठेवींतहि वाढ होऊन त्या ६१२·५१ कोटींच्या ६१६·२५ कोटी झाल्या.

### सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक लि., सातारा

वरील बँकेस १९५० वर्षअखेरचे व्यवहारांत ३३,२९४ रु नफा झाला. रिझर्व्ह फंड, संशयित कूळ फंड, इनव्हेस्टमेंट रिझर्व्ह फंड, इमारत फंड ह्यांत मिळून १६,२३७ रु. ८ आ. टाकून व ३,००० रु. नोकरवर्गास बोनस देऊन ऑर्डिनरी भागांस ६% करमाफ डिव्हिडंड देण्यासाठी १४,५०० रु. चा विनियोग करण्यांत आला. बँकेच्या इनव्हेस्टमेंटची बाजारभावाने होणारी किंमत ताळेबंदांत दाखविलेल्या किंमतीपेक्षां जास्त आहे ही गोष्ट ताळेबंदावरून शोधून काढतां येत असली तरी तो गुप्त रिझर्व्ह स्पष्ट करण्याचें बोर्डानें टाळलें आहे, ही गोष्ट बँकेच्या सावधगिरीच्या धोरणाची निदर्शक आहे. इतर बहुतेक बँकांना इनव्हेस्टमेंटमध्यें घसारा सोसावा लागलेला आहे.

संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | २,३५,६९० | रोख व बँकांत | ३,८०,२६९ |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,०३,६६२ | इनव्हेस्टमेंट | २०,२१,८४२ |
| ठेवी | ४२,४५,४८७ | कर्जे | २४,५२,५६० |

( चेअरमनः शं. ह. साठे, बी. ए., एलएल बी. मॅनेजरः व. य. कुळकर्णी, एम. ए., बी. कॉम. )

---

### दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

अहवालाचे वर्षी कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूज ह्यांच्या परवानगीनें दर्शनी किंमत रु. ३,००,००० चे ६,००० शेअर्स विक्रीस काढले होते, ते सर्व खपले आहेत. १९५० सालांतील व्यवहारांत बँकेस ४९,०२६ रु. नफा झाला. १०,००० रु. रिझर्व्ह फंड, ४,००० रु. इनव्हेस्टमेंट रिझर्व्ह फंड, ४,२०० रु. नोकरवर्गास बोनस आणि ३०,००० रु. डिव्हिडंड ( ६% करमाफ ) अशी नफावाटणी करण्यांत आली आहे. ८६½ लक्ष रुपयांच्या खेळत्या भांडवलांत युनायटेड वेस्टर्नचें स्वतःचें ७,११,४६५ रु. चें भांडवल आहे.

संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ५,६०,४६५ | रोख व बँकांत | १४,९०,८१० |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,५१,००० | इनव्हेस्टमेंट | ४०,२१,२९६ |
| ठेवी | ७५,३९,४३० | कर्जे | २५,३०,९११ |

( चेअरमनः वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., मॅनेजरः सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम. सेक्रेटरीः रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. )

---

**ब्रिटनमध्यें केळीं महागलीं**—केळ्यांचें वाटप करण्याच्या खर्चांत वाढ झाल्यामुळें केळ्यांच्या किरकोळ विक्रीच्या किंमतींत वाढ करण्यांत आली आहे. १८ वर्षांखालील मुलें, गर्भवती स्त्रिया आणि सत्तरीच्या आसपासचे वृद्ध ह्यांच्यासाठीं केळीं राखून ठेवण्याची पद्धतहि बंद करण्यांत आली आहे. इंग्लंड, वेल्स व उत्तर आयर्लंड ह्या भागांत १ पौंड केळ्याला १ शिलिंग किंमत ठरविण्यांत आली आहे.

**ब्रिटिश जहाजांपासून भारताला उत्पन्न**—गेल्या तीन वर्षांत भारताच्या किनाऱ्याला लागणाऱ्या ब्रिटिश जहाजांपासून भारतीय सरकारला दरवर्षी सरासरी ९३,१९,००० रुपये कराचें उत्पन्न झालें. १९४९–५० सालीं इतर परदेशी जहाजांपासून भारत सरकारनें १,०९,००० रुपये कर वसूल केला.


## दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली.

स्थापना १९२७

हेड ऑफिसः—हायस्कूल रोड, सांगली.

शाखाः—१ जत, २ मिरज.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये | १०,००,००० |
| खपलेलें " | रुपये | २,२१,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रुपये | १,४२,००० |
| फंडस् | रुपये | १,२३,००० |
| खेळतें भांडवल | रुपये | १५,००,००० चे वर |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

सरकारतर्फेः—

मे. भ. अं. दप्तरदार, B. A., चेअरमन.
मे. असि. रजिस्ट्रार को. सो. सातारा.
मे. रा. बा. आरवाडे, B. A., LL. B.
मे. ज. वि. करमरकर, सराफ.

सोसायट्यांतर्फेः—

मे. के. आ. चौगुले, B. A., LL. B.
मे. हिं. म. पाटील.
मे. रा. म. पाटील.

वैयक्तिक सभासदांतर्फेः—

मे. म. ह. गोडबोले, B. A., LL. B.
मे. सु. आ. पाटील.

करंट, सेव्हिंग्ज व कायम ठेवी स्वीकारल्या जातात.
बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

ना. पां. ठाणेदार, मॅनेजर. भ. अं. दप्तरदार, बी. ए. चेअरमन.

## बँक ऑफ पूना, लिमिटेड.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

— संचालक मंडळ —

१ श्री. मुरलीधर चतुरभुज लोया, ( चेअरमन )
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी., व्हा. चेअरमन
३ डॉ. ना. भि. परुळेकर, संचालक 'सकाळ'
४ श्री. फ्रामजी पेस्तनजी पोचा, सीड्स् मर्चंट
५ श्री. लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी, बँकर्स व मर्चंट सोलापूर
६ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी, व्यापारी
७ श्री. गणपतराव काळूराम नाईक, बी. एस्सी., बी. ई., एलएल्. बी.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत मौल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याची सोय.

ठेवीवर व्याज—

चालू खातें अर्धा टक्का, सेव्हिंग्ज १॥ टक्के,
मुदत ठेव १ वर्ष २॥ टक्के, ३ वर्षें ३ टक्के.

शाखा स्थानिक–(१) भवानी पेठ, व (२) सदाशिव पेठ, पुणें.
बाहेरगांवीं—सोलापूर, सांगली.
मुख्य ऑफिसः–४५५ रविवार पेठ, पुणें नं. २

गो. गं. साठे.
मॅनेजर.

संस्कार केंद्र समिती राहाता, ह्याचा होळी उत्सव

राहाता म. प. सोसायटीनें चालविलेलें राहाता ( जि. नगर ) येथील संस्कारकेंद्र, राहाता यांनीं शिमग्याचे सणानिमित्त लोकांचे करमणुकीचे निरनिराळे कार्यक्रम आंखून ते यशस्वी रीतीनें पार पडले. शास्त्रीय गाणें ( चढाओढ ), प्रभातफेरी, झेंडावंदन, शारीरिक व मर्दानी खेळ झाले. ग्रामपंचायत सरपंच श्री. मारुतीबाबा ह्यांचें भाषण, व्हॉली बॉल मॅच, व विजयी टीम ग्रामगत यांना रु. ५ व विरुद्ध सामनेवाली टीम साकुरी यांनाही प्रोत्साहनादाखल रु. २ बोन बक्षीस, शाळेंतील मुलामुलींचे चटकदार संवाद आणि गाणें व पोवाडे, वगैरे कार्यक्रम पार पडले. संस्कारकेंद्रानें रु. ५१ बक्षिसाकरितां खर्च केले.

श्री आनंदा जानकु गाडेकर यांचे हस्तें बक्षिससमारंभ होऊन समारोपाचें काम श्री. गाढे ॲग्रि. असि. यांनीं संस्कारकेंद्रातर्फे करून राष्ट्रगीत होऊन कार्यक्रम संपला, असें श्री. मो. म. क्षीरसागर, सेक्रेटरी, संस्कार केंद्र समिति, राहाता, हे कळवितात.

---

**सर्व कॉम्प्लिमेंटरी तिकिटांवर करमणूक-कर**

१ एप्रिल, १९५१ पासून करमणूक गृहाच्या मालकांनीं दिलेल्या सर्व कॉम्प्लिमेंटरी तिकिटांवर करमणूक-कर आकारण्यांत येतो.

---

**दातांचें मोफत इस्पितळ**—अमृतसर येथें दातांचें एक मोफत इस्पितळ नुकतेच उघडण्यांत आलें. इस्पितळासाठीं लागणारा पैसा सार्वजनिक वर्गणी करून जमविण्यांत आला. इस्पितळांत फुकट काम करण्याचें बऱ्याच दंतवैद्यांनीं कबूल केलें आहे. दातांची दुखणीं शक्य तोंवर उद्भवूच न देण्यासाठी औषधें देण्यावर विशेष जोर देण्यांत येणार आहे. ह्या इस्पितळाला जोडूनच एक दंतविषयक म्युझिअमहि काढण्यांत येणार आहे.

**संयुक्त-राष्ट्रसंघाला अर्थशास्त्रज्ञ पाहिजेत**—अपुरा विकास झालेल्या देशांच्या आर्थिक परिस्थितीसंबंधीं संशोधन करण्यासाठीं संयुक्त राष्ट्रसंघटनेला तज्ज्ञ अर्थशास्त्रज्ञांची जरूरी आहे. नियोजनाच्या तंत्राची माहिती, आर्थिक परिस्थितीचें पृथक्करण करण्याचा अनुभव आणि उच्च अर्थशास्त्रविषयक पदवी ह्या गुणांनीं युक्त असेच लोक घेतले जातील. वार्षिक पगार सुमारें ७,००० डॉलर्स मिळणार आहे.

**रशिआंत युद्धाची तयारी नाहीं**—रशिआंतील वृत्तपत्रांतून युद्धाचें वातावरण दिसत नाहीं, अशी माहिती न्यूयॉर्क टाइम्सच्या मॉस्को येथील वार्ताहरानें पाठविली आहे. सर्व वृत्तपत्रांतून अंतर्गत घडामोडीबद्दलच मजकूर अधिक आहे. वसंत ऋतूंतील पिकांची पेरणी करण्यांत शेतकरी गुंतले आहेत. येत्या कांहीं आठवड्यांत रशिआंतील स्त्री-पुरुष पिकें कापण्यांतच गुंतून राहतील अशी माहिती मिळाली आहे.

**युद्ध सुरू होण्यापूर्वी स्वयंपूर्ण बना**—युद्ध सुरू होण्यापूर्वी भारतानें जरूर अशा सर्व वस्तू देशांतच तयार करण्याचें ध्येय गांठलें पाहिजे, असे उद्गार उद्योगमंत्री श्री. मेहताब ह्यांनीं नुकतेच काढले. श्री. मेहताब अ. भा. कांच कारखानदारांच्या वार्षिक परिषदेंत भाषण करीत होते. ह्या धंद्याला लागणारा सोडा ॲश देशांतच तयार करतां येईल कीं नाहीं ह्याविषयीं संशोधन करण्यास आपण विकास-खात्याला सांगूं असेंहि ते म्हणाले. भारतांत सध्यां १०४ कांच-सामानाचे कारखाने आहेत. त्या सर्वांचें मिळून वार्षिक उत्पादन सुमारें १,५७,२०० टन होतें.


# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. १४८३ | "Cencobank" | नं. ५११ |

**मुख्य कचेरी—लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

**जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा, मंचर, भोर पौड व वडगांव (मावळ)**

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रबडे

मॅनेजिंग डायरेक्टर

( मिरज येथें १९२९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

# दि मिरज स्टेट बँक लि.

—मिरज—

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९२९ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. ११,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )

★ कुर्डुवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन. — के. डी. शिराळकर, मॅनेजर

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें.

—:शाखा:—

| | |
|---|---|
| (१) दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई. | (२) गिरगांव, मुंबई ४. |
| (३) दादर, मुंबई. | (४) डेक्कन जिमखाना, पुणें ४. |
| (५) खडकी, पुणें. | (६) जळगांव (पू. खा.) |
| (७) नागपूर (म. प्रं.) | (८) रत्नागिरी. |
| (९) कोपरगांव. | (१०) सोलापूर, (फलटण गल्ली) |
| (११) धुळें (प. खा.) | (१२) चाळिसगांव (पू. खा.) |
| (१३) नाशिक. | (१४) हुबळी. |
| (१५) कल्याण. | (१६) सोलापूर, मुरारजी पेठ. |
| (१७) कोल्हापूर. | (१८) हैद्राबाद (द.). |

दि. ३१ डिसेंबर, १९५० रोजींची परिस्थिति दाखविणारीं संक्षिप्त पत्रकें

ताळेबंद

## भांडवल व देणें

| | | रु. आ. पै |
|---|---|---|
| मागणी केलेलें व वसूल झालेलें भांडवल<br>प्रत्येकीं रु. ५० चे ६४,००० भाग प्रत्येकीं रु. २५ प्रमाणें मागणी केलेले व वसूल झालेले ... | | १६,००,०००–०–० |
| मागांपोटीं आगाऊ भरलेले | | १५०–०–० |
| रिझर्व्ह फंड ... | | ४,२१,०००–०–० |
| कॉन्टिन्जन्सी फंड ... | | ५०,०००–०–० |
| ठेवी व इतर खातीं | | |
| मुदतींच्या ठेवी | ६५,४८,९४३–४–६ | |
| सेव्हिंग्ज बँक खातीं | १,०१,६१,३७५–३–२ | |
| चालू व कॉन्टिन्जन्सी (अन् ॲडजस्टेड) खातीं | ६३,६३,२९२–१२–५ | २,३०,७३,६११–४–१ |
| बिल्स पेएबल | | २,११,८५७–४–६ |
| वसुलीसाठीं आलेलीं बिलें (येणेंकडे दाखविल्याप्रमाणें) | | १३,२३,९८८–६–१ |
| इतर लायाबिलिटीज् | | |
| मागणी न केलेलें डिव्हिडंड | ८,१३८–८–२ | |
| रिबेट ऑन बिल्स डिस्काउंटेड | १,००६–२–६ | |
| ब्रँच ॲडजस्टमेंटस् | १,७८,४८४–१२–९ | १,८७,६२९–७–५ |
| ॲक्सेप्टन्सेस, एंडॉर्समेंटस् व इतर ऑब्लिगेशन्स (येणेंकडे दाखविल्याप्रमाणें) | | ९९,०००–०–० |
| नफातोटा खातें— | | |
| मागील ताळेबंदांतून पुढें ओढलेली रक्कम | ४९,५९७–१५–१० | |
| १९५० सालचा निव्वळ नफा (ज्यावर इनकम् टॅक्स देणेंचा असा) | २,२९,६०१–८–७ | २,७९,१९९–८–५ |
| कॉन्टिन्जन्ट लायाबिलिटीज्<br>बँकेच्या इन्व्हेस्टमेंटसमधील जॉईंट स्टॉक कंपनीच्या अंशतः मागणी केलेल्या भागांवरील (सबसिडिअरी कंपनीचे शेअर्स धरून) न मागविलेली रक्कम | १,५६,७५०–०–० | |
| एकूण | | २,७२,४६,४३५–१४–६ |

## जिंदगी व येणें

| | रु. आ. पै |
|---|---|
| रोख व रिझर्व्ह बँकेकडे असलेली शिल्लक ... | २३,६४,२०२–०–११ |
| बँकांकडील शिल्लक-चालू खात्यांत... | ११,०९,४६२–१५–५ |
| बिल्स डिस्काउंटेड व परचेस्ड ... | ५,०६,५९२–८–९ |
| इन्व्हेस्टमेंटस् खरेदी किंमत<br>प्रांतिक व मध्यवर्ती सरकारांचे कर्जरोखे व ट्रस्टी सिक्युरिटीज्, शेअर्स, डिबेंचर्स व इतर इन्व्हेस्टमेंट ...<br>(बाजारभावानें किंमत ८७,६५,५६३–१–८) | ९०,०३,५४१–५–३ |
| कर्जें, कॅशक्रेडिट व ओव्हरड्राफ्टस् | १,२०,१२,१९३–१–२ |
| वसुलीसाठीं पाठविलेलीं बिलें (देणेंकडे दाखविलेप्रमाणें) ... | १३,२३,९८८–६–१ |
| अक्सेप्टन्सेस, एन्डॉर्समेंटस् व इतर लायाबिलिटीज् (देणेंकडे दाखविलेप्रमाणें) ... | ९९,०००–०–० |
| इमारत, इमारतीची जागा व सामान (वजा घसारा) ... | २,९२,५३१–१२–० |
| सेफ डिपॉझिट व्हॉल्ट खरेदी किंमत (वजा घसारा) ... | १,५७,८६९–९–३ |
| फर्निचर व फिक्चर्स (वजा घसारा) | ८९,०१८–८–८ |
| इतर असेट्स् स्टँप्स, इनकम्टॅक्स व्याज घेतांना कापलेला, व्याज-इन्व्हेस्टमेंटस् वरील चढलेलें, ॲडव्हान्स दिलेल्या रकमा, महाराष्ट्र एक्झिक्यूटर आणि ट्रस्टी कंपनीचे शेअर्स (अंशतः मागणी केलेले) | २,८७,६३५–११–० |
| एकूण | २,७२,४६,४३५–१४–६ |

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें.

### दि. ३१ डिसेंबर १९५० अखेर संपणाऱ्या वर्षाचें नफातोटापत्रक

| खर्च | रु. आ. पै | जमा ( संशयित व बुडित कर्जासाठीं चालू सालीं केलेली तरतूद वजा करून ) | रु. आ. पै |
|---|---|---|---|
| ठेवींवर दिलेलें व्याज ... | ३,२३,४९४—७—११ | व्याज, डिस्काउंट, डिव्हिडंड वगैरे ... | ९,१०,१६४—१—५ |
| पगार व भत्ते वगैरे ... | २,६७,१९५—६—२ | कमिशन, हुंडणावळ व ब्रोकरेज... | ७१,१४०—४—५ |
| डायरेक्टरांची फी व भत्ते ... | ६,३६०—०—० | इमारतीचें भाडें ( म्युनिसिपल कर व इतर खर्च वजा जातां ) ... | २,४१९—१—९ |
| स्थानिक सल्लागार समित्यांच्या सभासदांची फी व भत्ते ... | १,१५०—०—० | लॉकर्सचें भाडें ... | ३,६१३—३—० |
| नोकरवर्गाच्या प्रॉव्हिडंट फंडास काँट्रिब्यूशन ... | १२,२५१—११—९ | इतर ( ट्रॅन्सफर फीज् ) ... | २७४—४—० |
| ऑफिसभाडें, कर, विमे, दिवाबत्ती वगैरे ... | १०,१६७—१०—८ | | |
| लीगल चार्जेस ... | ४,८१४—०—० | | |
| टपाल, तार, टेलिफोन व स्टॅम्प्स्... | १४,९११—४—३ | | |
| ऑडिट फी ... | २,०००—०—० | | |
| घसारा ... | ९,०४०—१—[illegible] | | |
| स्टेशनरी, छपाई, जाहिरात वगैरे... | ३४,९९८—१३—० | | |
| कर्जरोख्यांच्या विक्रीवर आलेला तोटा ... | ३२,००४—१०—३ | | |
| इतर खर्च ... | | | |
| किरकोळ व प्रवास खर्च ... | १९,६२१—४—११ | | |
| निव्वळ नफा, ताळेबंदास ओढलेला ( ज्यावर इन्कम-टॅक्स देणेचा असा ) ... | २,२९,६०१—८—७ | | |
| | ९,८७,६१०—१४—७ | | ९,८७,६१०—१४—७ |

ग. ल. हळवे, अकौंटंट.  चिं. वि. जोग, मॅनेजर.  धों. कृ. साठे, अध्यक्ष.

गो. व. आपटे, बी. ए., जी. डी. ए., एफ. सी. ए., चार्टर्ड अकौंटंट.
कुलकर्णी आणि खानोलकर, चार्टर्ड अकौंटंट्स्, मुंबई } ऑडिटर्स.

श्री. गो. मराठे, न. ग. पवार, मा. रा. जोशी, शं. ल. किर्लोस्कर, मा. वी. शहा, फ. दी. पदमजी, भा. म. गुप्ते } संचालक

**सेव्हिंग्ज सर्टिफिकेटस्**—भारत सरकारनें फेब्रुआरी १९५१ पासून १० वर्षे मुदतीचीं ट्रेझरी सेव्हिंग्ज डिपॉझिट सर्टिफिकेटस् काढलीं होतीं. २७ मार्च १९५१ पर्यंत ४·८५ कोटी रुपयांच्या सर्टिफिकेटसूची विक्री झाली. १९४३ सालीं नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटची मोहीम सुरू करण्यांत आली. तेव्हांपासून डिसेंबर १९५० अखेर १२८ कोटी रुपयांचीं सर्टिफिकेटस् खपलीं. मुंबई प्रांतानें २२·४४ कोटी रुपयांचीं सर्टिफिकेटस् खरेदी केलीं व पहिला नंबर पटकावला.

**सीलोनमधील साखरेचा कारखाना**—सीलोन सरकारनें साखरेचा एक मोठा कारखाना काढण्याचें ठरविलें होतें. परंतु आतां तो २ वर्षेपर्यंत लांबणीवर पडला आहे. जंगल तोडण्याचीं यंत्रें आणि यंत्रचलित नांगर ह्यांचा तुटवडा पडल्यामुळें कारखाना लवकर निघूं शकत नाहीं. कारखान्याला उंसाचा पुरवठा व्हावा म्हणून ७,००० एकरांत उंसाची लागवड करण्यांत येणार होती.

**मुंबईला टाइपरायटरचा कारखाना**—मुंबईला टाइपरायटर्स तयार करण्याचे दोन कारखाने निघणार आहेत असें समजतें. एका कारखान्याला ब्रिटिश कारखान्याची आर्थिक मदत मिळणार आहे; आणि दुसऱ्या कारखान्याला इटालियन कारखानदाराचें सहकार्य मिळणार आहे. भारतांत टाइपरायटर्स तयार करणारे हे पहिलेच कारखाने होतील.

**ब्रिटनच्या लग्नसराईंत तेजी**—लंडनमधील लग्नें रजिस्टर करणाऱ्या कचेऱ्यांच्या समोर विवाहबद्ध होऊं इच्छिणाऱ्या जोडप्यांची रीघ लागली होती. ईस्टरच्या सणांत नेहमीच लग्नांची गर्दी असते; परंतु ह्या वर्षी ५ एप्रिलपूर्वी लग्नें करणाऱ्या जोडप्यांना बायकोसाठीं कराची थोडीशी सूट मिळणार होती. त्यामुळें लग्नांची संख्याहि वाढली. लंडनमध्यें गेल्या १ एप्रिल रोजीं दर १५ मिनिटाला एका लग्नाची नोंद झाली.

**असनसोलजवळ सायकलींचा कारखाना**—असनसोलपासून तीन मैलांवर असलेल्या कन्यापूर ह्या गांवीं सेन रॅले इंडस्ट्रिज लि. ह्या कंपनीच्या सायकलच्या कारखान्याच्या पायाचा दगड नुकताच बसविण्यांत आला. ह्या कारखान्यांत ज्या सायकली तयार करण्यांत येतील, त्यांच्यांत कांहीं सुटे भाग प्रथम कांहीं काळ परदेशी वापरण्यांत येणार आहेत. १९५१ च्या नोव्हेंबर महिन्यांत कारखाना चालू होईल असा अंदाज आहे. पहिल्या वर्षी ५०,००० व नंतर दरवर्षी २,००,००० सायकली तयार होतील.

**गुप्त रोग झालेल्यांना शिक्षा**—गुप्त रोग झालेल्या नागरिकांना उपचार करून घेण्याची सक्ति करणारा हुकूम हंगेरीच्या सरकारनें काढला आहे. हुकूम न मानणारांना २ महिने कैद आणि १६६ पौंड दंड अशी शिक्षा ठेवण्यांत आली आहे. रोग्यांचीं नांवें न कळविल्यास डॉक्टर्सनाहि शिक्षा देण्यांत येणार आहेत.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.